७८३९५-७१२७१

**आरबीआय/२००६-०७/३७**

आरपीसीडी.पीएलएनएफएस.बीसी.क्र.०६/०६.०२.३१/२००७-०८

जुलै २, २००७

**अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक/**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सर्व व्यावसायिक बँका**
**(विभागीय ग्रामीण बँका/स्थानिक क्षेत्र बँकांसहित)**

माननीय महोदय,

**महापरिपत्रक —**
**लघु आणि मध्यम उद्यम(एसएमइज) क्षेत्राला कर्जे देणे**

जसे तुम्ही जाणता कि, लघु उद्योग क्षेत्र त्याचप्रमाणे लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्राला कर्जे देण्याच्या संबंधातील विषयावर, भारतीय रिझर्व्ह बँकेने, वेळोवेळी बँकांना अनेक मार्गदर्शक तत्त्वे/सूचना/आदेश निर्गमित केले आहेत. बँकांना चालू सूचना एकाच जागी उपलब्ध होणे शक्य व्हावे म्हणून या विषयावरील विद्यमान मार्गदर्शक तत्त्वे/सूचना/आदेश अंतर्भूत करणारे एक महापरिपत्रक तयार करण्यात आले आहे आणि सोबत जोडण्यात आले आहे. हे महापरिपत्रक आरबीआयने जून ३०, २००७ पर्यंत निर्गमित केलेल्या, व्यावसायिक बँकांनी एसएसआय आणि एसएमइ क्षेत्राला कर्जे देण्याच्या बाबतीतील सूचना ज्या परिशिष्टात सूचिबध्द केलेल्या आहेत, एकत्रित करते.

कृपया पोंच द्यावी.

आपला विश्वासू

**(जी. श्रीनिवासन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

## १ लघु उद्योग

### १.१.१ लघु (उत्पादक) उद्योग

मालाचे उत्पादन, प्रक्रिया आणि संवर्धन यात कार्यरत असणाऱ्या आणि ज्यांची यंत्रसामग्री आणि संयंत्रातील गुंतवणूक (जमीन आणि इमारत आणि परिशिष्ट १ मध्ये दिलेल्याप्रमाणे लघु उद्योग मंत्रालयाने आपल्या अधिसूचना क्र. एस.ओ. १७२२(इ) दिनांक ऑक्टोबर ५, २००६ अन्वये विनिर्दिष्टीत केलेल्या बाबी वगळता मूळ किंमत) रु. ५ कोटींपेक्षा अधिक नाही.

### १.१.२ लघु (सेवा) उद्योग

सेवा पुरविण्यात/देण्यात व्यस्त असणारे उद्योग आणि ज्यांची उपकरणातील गुंतवणूक जमीन आणि इमारत आणि फिटिंग्स, फर्निचर आणि देण्यात येणाऱ्या सेवेशी थेट संबंधित नसणाऱ्या किंवा मायक्रो, लघु आणि मध्यम उद्योग विकासाअधीन असेल अशी वगळता मूळ किंमत) रु. २ कोटीपेक्षा अधिक असणार नाही.

### १.२.१ मायक्रो (उत्पादक ) उद्योग

मालाचे उत्पादन/निर्मिती किंवा संवर्धनात व्यस्त असणारे उद्योग आणि ज्यांची यंत्रसामग्री आणि संयंत्रातील गुंतवणूकजमीन आणि इमारत आणि १.१.१ मध्ये असल्याप्रमाणे बाबींची मूळ किंमत वगळता) युनीटचे स्थान विचारात न घेता, रु. २५ लाखाहून अधिक नाही.

### १.२.२ मायक्रो (सेवा) उद्योग

सेवा पुरविण्यात/देण्यात व्यस्त असणारे उद्योग आणि ज्यांची उपकरणातील गुंतवणूक (जमीन आणि इमारत आणि १.१.२ मध्ये असल्याप्रमाणे बाबी वगळता मूळ किंमत) रु. १० लाखापेक्षा अधिक असणार नाही.

### १.३.१ मध्यम (उत्पादक) उद्योग

मालाचे उत्पादन, प्रक्रिया आणि संवर्धन यात कार्यरत असणाऱ्या आणि ज्यांची यंत्रसामग्री आणि संयंत्रातील गुंतवणूक (जमीन आमि इमारत आणि परिशिष्ट १ मध्ये दिलेल्याप्रमाणे लघु उद्योग मंत्रालयाने आपल्या अधिसूचना क्र. एस.ओ. १७२२(इ) दिनांक ऑक्टोबर ५, २००६ अन्वये विनिर्दिष्टीत केलेल्या बाबी वगळता मूळ किंमत) रु. ५ कोटींपेक्षा अधिक आहे पण १० कोटीपेक्षा अधिक नाही.

### १.३.२ मध्यम (सेवा) उद्योग

सेवा पुरविण्यात/देण्यात व्यस्त असणारे उद्योग आणि ज्यांची उपकरणातील गुंतवणूक (जमीन आणि इमारत आणि फर्निचर, फिटिंग्स आणि १.१.२ मध्ये असल्याप्रमाणे बाबी वगळता मूळ किंमत) रु. २ कोटीपेक्षा अधिक पण रु. ५ कोटीपेक्षा अधिक असणार नाही.
लघु आणि मायक्रो (सेवा) उद्योगात लहान रस्ते आणि जल वाहतूक चालक, छोटे धंदे, व्यावसायिक आणि स्वयंरोजगारी व्यक्ति आणि अन्य सर्व सेवा उद्योगांचा समावेश असेल.
मध्यम उद्योगांना बँकांनी दिलेली कर्जे प्राधान्यता क्षेत्राला कर्जाखाली मानली जाऊ नयेत.

### १.४ खादी आणि ग्रामोद्योग क्षेत्र(केव्हीआय)

केव्हीआय क्षेत्रातील युनीटसना, त्यांच्या कार्याचा, स्थानाचा आणि यंत्रसामग्री आणि संयंत्रातील मूळ गुंतवणूकीचा विचार न करता, मंजूर केलेली अग्रिमे. अशी अग्रिमे प्राधान्यात

क्षेत्रांतर्गत लघु उद्योग विभागाच्या उपलक्ष्याअधीन (६० टक्के) विचारात घेण्यास पात्र असतील.

## १.५ अप्रत्यक्ष वित्तपुरवठा

**१.५.१** कारागीर, ग्रामीण आणि कुटीर उद्योग यांच्या निविष्टीच्या पुरवठ्यात आणि उत्पादनाच्या विपणनात विकेंद्रित क्षेत्राला सहाय्य करण्यात कार्यरत असणाऱ्या व्यक्ति.

**१.५.२** विकेंद्रित क्षेत्रातील उत्पादकांच्या म्हणजेच कारागीर, ग्रामीण आणि कुटीर उद्योग यांच्या सहकारी संस्थांना अग्रिमे.

**१.५.३** केवळ बिगर-शेती क्षेत्राला वित्तपुरवठा करण्याच्या हेतूने नाबार्डने निर्गमित केलेल्या विशेष रोख्यात बँकानी मार्च ३१, २००७ रोजी असल्याप्रमाणे विद्यमान गुंतवणूक अशा रोख्यांची मुदतपूर्ती तारीख किंवा मार्च २०१० यापैकी जी आधी असेल तोपर्यंत अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकृत करता येईल. तथापि, मार्च ३१, २००७ नंतर अशा रोख्यात केलेली गुंतवणूक अशा वर्गीकरणासाठी पात्र असणार नाही.

**१.५.४** भारतात कार्यालये असणाऱ्या विदेशी बँकानी, प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्यांच्या/उपलक्ष्यांच्या प्राप्तीतील अपयशाखाती आणि एप्रिल ३०, २००७ रोजी थकित असल्याप्रमाणे सिडबीकडे ठेवलेल्या ठेवी अशा ठेवींची मुदतपुर्तीची तारीख किंवा मार्च ३१, २०१० यापैकी जी आधी असेल तोपर्यंत लघु उद्योग क्षेत्राला अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणास पात्र असतील. तथापि, एप्रिल ३०, २००७ रोजी किंवा त्यानंतर बँकानी प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्यांच्या/उपलक्ष्यांच्या प्राप्तीतील अपयशाखाती सिडबीकडे ठेवलेल्या ठेवी लघु उद्योग क्षेत्राला अप्रत्यक्ष वित्तपुरवठा म्हणून वर्गीकरणास पात्र नसतील.

**१.५.५** बँकांनी पुढे लघु आणि मध्यम उद्योगांना (उत्पादक तसेच सेवा) कर्जे देण्यासाठी एनबीएफसीजना मंजूर केलेली कर्जे.

## खंड २

## प्राधान्य क्षेत्र अग्रिम म्हणून पात्र असलेली काही प्रकारची निधीची तैनात

### १. गुंतवणूक

### १.१ प्रतिभूत मत्ता

बँकानी प्रतिभूत मत्तेत, प्राधान्यता क्षेत्राच्या विविध प्रवर्गांना कर्जाचे प्रतिनिधीत्व करणारी गुंतवणूक, त्याखाली येणाऱ्या मत्तेवर अवलंबून, प्रतिभूत मत्ता मूळात बँका आणि वित्तीय संस्थांतून निर्माण झाली असेल आणि ती प्रतिभूतीकरणाचे भारतीय रिझर्व्ह बँकेचे सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करीत असेल तर, प्राधान्यता क्षेत्राच्या संबंधित प्रवर्गाअधीन वर्गीकरणास पात्र असेल. याचा अर्थ असा असेल कि, प्रतिभूत मत्तेच्या उक्त प्रवर्गातील बँकांची गुंतवणूक प्राधान्यता क्षेत्राच्या संबंधित प्रवर्गाअधीन वर्गीकरणास, झर अशी प्रतिभूत अग्रिमे त्यांच्या प्रतिभूतीकरणापूर्वी प्राधान्यता क्षेत्र अग्रिमे म्हणून वर्गीकरणास पात्र असतील तरच पात्र असतील.

**१.२** प्राधान्यता क्षेत्राखाली कोणत्याही कर्जाऊ मत्तेची मालकीहक्काने खरेदी प्राधान्यता क्षेत्राच्या संबंधित प्रवर्गाअधीन(प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष) वर्गीकरणास पात्र असेल जर, खरेदी केलेले कर्ज प्राधान्यता क्षेत्राखाली वर्गीकरणास पात्र असेल, कर्जाऊ मत्ता विक्रेत्याच्या कोणत्याहि सहभागाविना बँका आणि वित्तीय संस्थांकडून खरेदी केली असेल (योग्य त्या कार्यासक्ति आणि उचित किंमतीला), आणि पात्र कर्जाऊ मत्तेची खरेदीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत, परतफेडीशिवाय, अन्य कोणत्याही मार्गाने विल्हेवाट लावण्यात आली नसेल.

**१.३** जोखीम विभागून घेण्याच्या तत्त्वावर, बँकानी आंतरबँकीय प्रमाणपत्रात(आयबीपासाज) केलेली गुंतवणूक, प्राधान्यता क्षेत्राच्या संबंधित प्रवर्गाखाली वर्गीकरणास पात्र असेल, जर त्याखालील मत्ता प्राधान्यता क्षेत्राच्या संबंधित प्रवर्गाखाली वर्गीकरणास पात्र असेल आणि गुंतवणूकीच्या तारखेपासून किमान १८० दिवस धारण केलेली असेल.

### २. स्मॉल एन्टरप्राइझेस फाइनॅन्शियल सेंटर्स (एसइएफसीज) ची योजनाः

गव्हर्नरनी २००५-०६ साठी वार्षिक धोरण निवेदनात घोषित केल्याप्रमाणे, बँका आणि समूहस्थित सिडबी यांच्यातील धोरणात्मक युतिसाठी, स्मॉल एन्टरप्राइझेस फाइनॅन्शियल सेंटर्स नावाची योजना, एसएसएय मंत्रालय आणि बँकिंग विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार, सिडबी, आयबीए आणि निवडक बँकांशी सल्लामसलत करून आखण्यात आली आहे आणि मे २०, २००५ रोजी सर्व अनुरसूचित व्यावसायिक बँकांना अंमलबजावणीसाठी वितरित करण्यात आली आहे. आरंभीला सिडबीने अशी १४९ केंद्रे सुरू करण्याचे ठरविले आहे. सिडबीने आतापर्यंत १६ बँकांशी (बँक ऑफ इंडिया, युको बँक, येस बँक, बँख ऑफ बरोडा, ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स, पंजाब नॅशनल बँक, देना बँक, आंध्रा बँक, इंडियन बँक, कॉर्पोरेशन बँक, आयडीबीआय बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र आणि फेडरल बँक) एमओयु निष्पादित केली आहे. विद्यमान सिडबी शाखांनी समाविष्ट करून घेतलेल्या एसएमइ समूहांची सूची **परीशिष्ट** २ मध्ये दिली आहें.

## खंड ३

## <u>अनुसूचित व्यावसायिक बँकांद्वारे (आरआरबीज वगळून) प्राधान्यता क्षेत्राला कर्ज देण्यासाठी लक्ष्ये</u>

### १. विदेशी बँका वगळता सर्व अनुसूचित व्यावसायिक बँकांसाठी मुख्य लक्ष्ये

**१.१** अनुसूचित व्यावसायिक बँकानी प्राधान्य क्षेत्राला क्रेडिट वाढविणे आणि प्राधान्य क्षेत्राला अग्रिमे (ज्यामध्ये एसएसआय क्षेत्राचा समावेश आहे) नक्त बँक क्रेडिटच्या ४० टक्के किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरच्या सममूल्य रक्कम यापैकी जी अधिक असेल ती असतील याची खात्री करून घेणे अपेक्षित आहे.

**१.२** एसएसआय क्षेत्राला कर्ज देण्यासाठी जरी उपलक्ष्ये ठरविण्यात आली नसली तरी, भारत सरकारने एसएमइ क्षेत्राला क्रेडिट्ला गति देण्यासाठी जाहीर केलेल्या पॉलिसी पॅकेजनुसार, बँकांनी ५ वर्षांच्या म्हणजेच २००५-०६ पासून २००९-१० पर्यंतच्या कालावधीत एसएमइ क्षेत्राला क्रेडिट दुप्पट करण्याच्या उद्देशाने एसएमइ क्रेडिटमध्ये वर्षागणिक किमान २० % वाढ गाठण्याच्या दृष्टीने एसएमइ क्षेत्राला क्रेडिटमध्ये वाढ करण्यासाठी उपलक्ष्ये निश्चित करावीत.

**१.३** एसएसआय क्षेत्राच्या सर्व विभागांना क्रेडिट उपलब्ध होईल याची खात्री करण्यासाठी, बँकांनी काळजी घ्यावी कि-

(अ) लघु उद्योग क्षेत्राला एकूण अग्रिमांपैकी ४० % संयंत्र आणि यंत्रसामग्री यातील गुंतवणूक रु. ५ लाखांपर्यंत असणाऱ्या मायक्रो (उत्पादक) उद्योगाना आणि उपकरणातील गुंतवणूक रु. २ लाखांपर्यंत असणाऱ्या मायक्रो (सेवा) उद्योगाना जाईल.;

(ब) लघु उद्योग क्षेत्राला एकूण अग्रिमांपैकी २० % संयंत्र आणि यंत्रसामग्री यातील गुंतवणूक रु. ५ लाखांच्या वर आणि रु. २५ लाखांपर्यंत पर्यंत असणाऱ्या मायक्रो (उत्पादक) उद्योगाना आणि उपकरणातील गुंतवणूक रु. २ लाखांच्या वर आणि रु. १० लाखांपर्यंत असणाऱ्या मायक्रो (सेवा) उद्योगाना जाईल.

### २. विदेशी बँकांसाठी लक्ष्ये

**२.१.१** विदेशी बँकानी लघु उद्योग क्षेत्राला क्षेत्राला क्रेडिट वाढविणे आणि प्राधान्यता क्षेत्राला अग्रिमे (ज्यात लघु उद्योगांचा समावेश आहे) एकूण समायोजित नक्त बँक क्रेडिट(एएनबीसी) किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजर, यापैकी जे अधिक असेल त्याच्या ३२ टक्के असतील याची खात्री करावी.

**२.१.२** विदेशी बँकांनी प्राप्त करायच्या ३२ टक्के एकूण लक्ष्यांतर्गत, लघु उद्योग क्षेत्राला अग्रिमे समायोजित नक्त बँक क्रेडीट (एएनबीसी) किंवा ऑफ-बॅलन्स शूट एक्स्पोजर ची क्रेडीट सममूल्य रक्कम यापैकी जी अधिक असेल त्याच्या १० टक्के नसावी.

**२.१.३** लघु उद्योग क्षेत्राच्या सर्व विभागांना कर्जे उपलब्ध व्हावीत या दृष्टीने बँकांनी खात्री करावी कि-

(अ) लघु उद्योग क्षेत्राला एकूण अग्रिमांपैकी ४० % संयंत्र आणि यंत्रसामग्री यातील गुंतवणूक रु. ५ लाखांपर्यंत असणाऱ्या मायक्रो (उत्पादक) उद्योगांना आणि उपकरणातील गुंतवणूक रु. २ लाखांपर्यंत असणाऱ्या मायक्रो (सेवा) उद्योगांना जाईल.

(ब) लघु उद्योग क्षेत्राला एकूण अग्रिमांपैकी २० % संयंत्र आणि यंत्रसामग्री यातील गुंतवणूक रु. ५ लाखांच्या वर आणि रु. २५ लाखांपर्यंत पर्यंत असणाऱ्या मायक्रो (उत्पादक) उद्योगांना आणि उपकरणातील गुंतवणूक रु. २ लाखांच्या वर आणि रु. १० लाखांपर्यंत असणाऱ्या मायक्रो (सेवा) उद्योगांना जाईल (अशा प्रकारे लघु उद्योगाला अग्रिमांपैकी ६० टक्के मायक्रो उद्योगांना जावीत.)

[नक्त बँक क्रेडीट रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ च्या कलम ४२(२) अधीन सादर केलेल्या पाक्षिक अहवालातील आकड्यांशी जुळणारे असावेत. प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्याच्या/उपलक्ष्याच्या हिशेबासाठी एफसीएनर(बी) आणि एनआरएनआर योजनेखालील थकित ठेवी वगळल्या आहेत. तथापि, एनआरएनआर योजना स्थिगितकरण्यात आलेली असल्यामुळे, एनआरएनआर खात्याखालील विद्यमान खाती परिपत्रक डीबीओडी डीआयआर.बीसी. ९३/१३.०१.०९/२००१-०२ दिनांक एप्रिल २९,२००२ अन्वये कळविल्याप्रमाणे केवळ मदतपूर्तीच्या तारखेपर्यंतच चालू ठेवता येतील.]

## ३. विदेशी बँकानी प्राधान्य क्षेत्राला कर्जे देण्यातील तुटीपोटी सीडबीकडे ठेवलेल्या ठेवी

**३.१** ठरवून दिलेली लक्ष्ये आणि उपलक्ष्ये प्राप्त करण्यात आलेल्या अपयशाच्या प्रसंगात, विदेशी बँकानी लक्ष्ये/उपलक्ष्ये गाठण्यात आलेल्या अपयशाची भरपाई, तुटीच्या सममूल्य रक्कम, स्मॉल इंडस्ट्रीज डेवलपमेंट बँक ऑफ इंडिया(सीडबी) बँक स्थापन करणार असलेल्या लघु उद्योग विकास निधीला (एसइडीएफ) ला किंवा भारतीय रिझर्व्ह बँक ठरवून देईल अशा अन्य कोणत्याहि हेतूसाठी अंशदान करून केली पाहिजे.

**३.२** अशा वाटपाच्या हेतूने, लगेचच्या आधीच्या आर्थिक वर्षातील मार्चच्या शेवटच्या अहवालाच्या शुक्रवारी असल्याप्रमाणे प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याचा स्तर विचारात घेतला जाईल.

**३.३** एसइएफडीपीचा कॉर्पस निधी भारतीय रिझर्व्ह बँक वर्षागणिक तत्त्वावर ठरवील. ठेवींचा कालावधी तीन वर्षांचा किंवा वेळोवेळी रिझर्व्ह बँक ठरवील त्याप्रामाणे असेल. कॉर्पसच्या ५० टक्के एएनबीसी किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरची सममूल्य क्रेडीट रक्कम यापैकी जी अधिक असेल तिच्या ३२ टक्के, प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्यातील तूटीपोटी विदेशी बँका यथाप्रमाणे जमा करतील. शेष ५० टक्के लघु उद्योग क्षेत्र आणि निर्यात क्षेत्राला कर्जे देण्याच्या, एएनबीसीच्या किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजरची क्रेडीट सममूल्य रक्कम, यापैकी जी अधिक असेल त्याच्या अनुक्रमे १० टक्के आमि १२ टक्के कर्ज देण्यातील तूटीपोटी विदेशी बँका यथाप्रमाण जमा करतील. विदेशी बँकानी करावयाचे अंशदान, तरीही, विदेशी बँकांसाठी प्रादान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्यातील/उपलक्ष्यातील तूटीच्या रकमेपेक्षा अधिक नसेल.

**३.४** संबंधित विदेशी बँकांना सिडबी किंवा रिझर्व्ह बँक ठरवील ती अन्य संस्था त्यांना निधीची गरज असेल तेव्हा एक महिन्याच्या सूचनेनंतर बोलावणे पाठवतील.

**३.५** विदेशी बँकांच्या अंशदानावर व्याजाचा दर, ठेवींचा कालावधी वगैरे रिझर्व्ह बँक वेळोवेळी निश्चीत करील.

**४.** प्राधान्यता क्षेत्र लभ्ये आणि उपलक्ष्ये यांच्या प्राप्तीतील तूट विविध हेतूंसाठी नियामक निपटारे/मंजूरी देताना विचारात घेतली जाईल.

**[एएनबीसी किंवा ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजर्स (भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग प्रचालन विभागाने वेळोवेळी व्याख्या केल्याप्रमाणे) आधीच्या वर्षीच्या मार्च अखेरीला थकित असल्याच्या संदर्भात घेतली जाईल. या हेतूने यापुढे थकित एफसीएनआर(बी) आणि एनआरएनआर ठेवींची शिल्लक प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या हेतूसाठी एएनबीसीचा हिशोब करण्यासाठी वजा केली जाणार नाही. प्राधान्यता क्षत्राला कर्जे देण्याच्या हेतूने, एएनबीसी, एनबीसी अधिक बँकांनी एचटीएम प्रवर्गात धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यात केलेली गुंतवणूक दर्शविते. भारत सरकारने आणलेल्या रिकॅपिटलायझेशन फंडात बँकानी केलेलली गुंतवणूक एएनबीसीचा हिशोब करण्यासाठी विचारात घेतली जाणार नाही. परिपत्रक आरपीसीडी क्र. प्लॅन बीसी.८४/०४.०९.०१/२००६-०७ दिनांक एप्रिल ३०, २००७ च्या तारखेप्रमाणे असलेली बँकांनी एचटीएम प्रवर्गात धारण केलेली लॉल-एसएलआर फंडात बँकानी केलेली विद्यमान गुंतवणूक, मार्च ३१, २०१० पर्यंत एएनबीसीच्या हिशोबासाठी विचारात घेतली जाणार नाही. परंतु बँकांनी एचटीएम प्रवर्गात धारण केलेली नवीन गुंतवणूक या हेतूसाठी विचारात घेतली जाईल. प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्यातील/उपलक्ष्यातील तूटीपोटी, नाबार्ड/सिडबीकडे, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, ठेवलेल्या ठेवी, जरी बॅलन्स शीट मध्ये बाब १ (४)-'अन्य' मध्ये परिशिष्ट -८ –'गुंतवणूक' मध्ये दाखविण्यात आल्या असल्या तरी, त्या एचटीएम प्रवर्गाअधीन धारण केलेल्या नॉन-एसएलआर रोख्यातील गुंतवणूक मानण्यात येणार नाहीत. ऑफ-बॅलन्स शीट एक्स्पोजर्सच्या हिशोबासाठी बँका चालू एस्क्पोजर पद्धतीचा वापर करू शकतात. प्राधान्यता क्षेत्राला कर्जे देण्याच्या लक्ष्याच्या/उपलक्ष्याच्या हेतूसाठी आंतरबँक एक्स्पोजर्स हिशोबात धरली जाणार नाहीत.]**

**<u>खंड ४</u>**

**<u>एसएसआय/एसएमइ क्षेत्राला कर्ज देण्यासाठी सामान्य मार्गदर्शक तत्त्वे/सूचना</u>**

### १ अर्जांची विल्हेवाट

अर्ज सर्व प्रकारे पूर्ण भरलेले असतील आणि प्रत्येक अर्जाबरोबर जर 'चेक लिस्ट'' जोडलेली असेल तर रु. २५,०००/- पर्यंतच्या क्रेडिट मर्यादेतील सर्व एसएसआयसाठी अर्जांची २ आठवड्यांच्या आत आणि रु. ५ लाखांपर्यंतच्या अर्जांची ४ आठवड्यांच्या आत विल्हेवाट लावण्यात यावी.

### २ सांपार्श्विक

सांपार्श्विक सुरक्षा प्राप्त करण्यासाठी सर्व एसएसआय कर्जाऊ खात्यांसाठी मर्यादा रु. ५ लाख आहे. बँका एसएसआयच्या चांगल्या पार्श्वभूमीच्या आणि आर्थिक स्थितीच्या आधारावर सांपार्श्विक आवश्यकता काढून टाकण्याची मर्यादा रु. २५ लाखांपर्यंत वाढवू शकतात (उचित अधिकाऱ्यांच्या मान्यतेने ).

### ३. संयुक्त कर्ज

एसएसआय उद्योजकांना त्यांचे खेळते भांडवल आणि मुदत कर्जे एकाच खिडकीतून प्राप्त करणे शक्य व्हावे यासाठी बँका रु. १ कोटीपर्यंतची संयुक्त कर्ज मर्यादा मंजूर करू ाकतात.

### ४. एसएसआय/एसएमइ विशेष शाखा

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी प्रत्येक जिल्ह्यात किमान एक एसएसआय विशेष शाखा उघडावी असा त्यांना सल्ला देण्यात आला आहे. त्यापुढे, बँकांना त्यांच्या ६० % किंवा अधिक अग्रिमे एसएसआय देणाऱ्या सामान्य शाखाना एसएसआय विशेष शाखा म्हणून वर्गीकृत करण्यास परवानगी दिलेली आहे, जेणेकरून या क्षेत्राला एकंदरीत अधिक सेवा पुरविण्यासाठी अधिक एसएसआय विशेष शाखा उघडण्यास प्रोत्साहन मिळेल. भारत सरकारने एसएमइ क्षेत्राला क्रेडिटला गति देण्यासाठी जाहीर केलेल्या पॉलिसी पॅकेजनुसार, सार्वजनिक क्षेत्रातील बँकानी, उद्योजकाना बँका क्रेडिट मिळविणे सुलभ व्हावे आणि बँकेच्या कर्मचाऱ्याना आवश्यक प्रावीण्य विकसित करता यावे या दृष्टीकोनातून लघु उद्योगांचे प्राबल्य असलेल्या एसएमइ विशेष शाखा निश्चित केलेल्या समूहात/ केंद्रात असतील याची खात्री करावी. विद्यमान एसएसआय विशेष शाखाना सुध्दा एसएमइ शाखा म्हणून पुनर्नियुक्त करता येईल. त्यांची मुख्य कार्यक्षमता जरी एसएमइ क्षेत्राला वित्तपुरवठा आणि अन्य सेवा पुरविण्यासाठी वापरली जाईल, त्यांना अन्य क्षेत्राना/ऋणकोना वित्तपुरवठा करण्यास/अन्य सेवा पुरविण्यासाठी प्रचालनीय लवचिकता असेल.

### ५. प्रदानात दिरंगाई

लघु उद्योग अणि संबंधित औद्योगिक उपक्रम याना प्रदानातील दिरंगाईवर व्याजाच्या सुधारित अधिनियम १९९८ अधीन एसएसआयना दिरंगाईने प्रदान करण्याची काळजी घेण्यासाठी दंडनीय तरतूदी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत जो इतर बाबींबरोबरच ठरवून देतो अ) विक्रेता आणि खरेदीदार यांच्यातील करार १२० दिवसांपेक्षा अधिक नसावा ब) १२० दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या मान्य कालावधीच्या पलिकडील कोणत्याही दिरंगाईसाठी खरेदीदाराने एसबीआयच्या प्राइम लेंडिंग रेट (पीएलआर) च्या दीडपट दराने व्याजाचे प्रदान. त्यापुढे, मोठ्या ऋणकोंना, खास करून एसएसआयकडून खरेदीच्या बाबतीतील प्रदानाची

बांधिलकी पूर्ण करण्यासाठी एकूण खेळत्या भांडवल मर्यादेच्या अंतर्गत उपमर्यादा निश्चित करण्यासाठी कळविण्यात आले आहे.

मायक्रो, स्मॉल अँड मिडीयम एन्टरप्राझेस डेवलपमेंट(एमएसएमइडी) अधिनियम २००६ अस्तित्वात आल्यानंतर, लघु आणि संबंधित औद्योगिक उपक्रमांना इंटरेस्ट ऑन डिलेड जेमेंट अधिनियम, १९९८ च्या विद्यमान तरतूदी खालीलप्रमाणे अधिक मजबूत झाल्या आहेतः

(१) खरेदीदाराने, जर विवक्षित तारखेला कोणताही करार नसेल तर, त्याने आणि पुरवठादाराने लेखी मान्य केलेल्या तारखेला किंवा त्यापूर्वी प्रदान केले पाहिजे. विक्रेता आणि खरेदीदार यांच्यातील करार ४५ दिवसाहून अधिक असता कामा नये.

(२) खरेदीदार पुरवठादाराला रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरला तर तो, रिझर्व्ह बँकेने अधिसूचित केलेल्या बँक दराच्या तीन पट दराने, विवक्षित तारखेपासून किंवा मान्य केलेल्या तारखेपासून, पुरवठादाराला रकमेवर मासिक अंतराने चक्रवाढ व्याज देण्यास पात्र असेल.

(३) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या कोणत्याही मालासाठी किंवा पुरविलेल्या सेवेसाठी, उक्त (२) मध्ये दिल्याप्रमाणे व्याज प्रदान करण्यास पात्र असेल.

(४) देय रकमेबाबत कोणताही वाद असल्यास, तो संबंधित राज्य सरकारने स्थापन केलेल्या मायक्रो अँड स्मॉल एन्टरप्राइझेस कौन्सिलकडे संदर्भित करावा.

## ६. आजारी एसएसआय युनीटसच्या पुनर्वसनासाठी मार्गदर्शक तत्त्वे (कोहली कार्यकारी गटाच्या शिफारशींच्या आधारे)

व्याख्येनुसार, एखादे युनीट आजारी आहे असे मानले जाते जेव्हा युनीटचे कोणतेही कर्ज खाते ६ महिन्यांहून अधिक काळ दुय्यम दर्जाचे राहते किंवा आधीच्या लेखा वर्षात त्याच्या नक्त उत्पन्नाच्या ५० टक्क्यांपर्यंतच्या संचित रोख तोट्यामुळे नक्त उत्पन्नात घट होते आणि युनीट किमान दोन वर्षे व्यावसायिक उत्पादन करीत आहे. या निकषामुळे बँकांना प्रारंभीच्या पायरीवर आजार शोधणे आणि युनीट परत चालू करण्यासाठी दुरुस्तीची कृती करणे शक्य होईल. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, युनीट संभवतः जीवनक्षम/जीवनक्षम आहे असे घोषित झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत पुनर्वसन पॅकेजची अंमलबजावणी केली पाहिजे. पुनर्वसन पॅकेज निश्चित करण्याच्या आणि अंमलात आणण्याच्या या सहा महिन्यांच्या काळात बँका/एफआयज यांनी 'होल्डिंग ऑपरेशन' करणे आवश्यक आहे ज्यामुळे आजारी युनीटला जमा केलेल्या विक्रीच्या उत्पन्नाच्या मर्यादेपर्यंत तरी कॅश क्रेडिट खात्यातून निधी काढता येईल.

संभाव्य जीवनक्षम आजारी एसएसआय युनीटसच्या पुनरुभारणीसाठी मदत आणि सवलती देण्यासाठी पुढील सर्वसाधारण मापदंड आहेत.

| | |
|---|---|
| (१) खेळत्या भांडवलावर व्याज | जेथे लागू असेल तेथे, चालू असलेल्या नियत/प्राइम लेंडिंग रेटच्या १.५ % खाली |
| (२) निधीकृत व्याज मुदत कर्ज | व्याज मुक्त |
| (३) खेळते भांडवल मुदत कर्ज | जेथे लागू असेल तेथे, चालू असलेल्या नियत/प्राइम लेंडिंग रेटच्या १.५ % खाली |

| | |
|---|---|
| | व्याज आकारावे |
| (४) मुदत कर्ज | कागदोपत्री दराच्या खाली २ % हून अधिक नसलेली सवलत व्याजात द्यावी (लहान/विकेंद्रित क्षेत्राच्या बाबतीत ३ % हून अधिक नाही) |
| (५) पर्यायी कर्ज सहाय्य | खेळते भांडवल सहाय्यासाठी सवलतीचा दर अनुज्ञेय |

## ७. राज्यस्तरीय आंतरसंस्था समिती

आजारी लघु उद्योग युनीटच्या पुनर्वसनासाठी समन्वयातील अडचणी सोडविण्यासाठी, सर्व राज्यांमध्ये राज्यस्तरीय आंतरसंस्था समित्या (एसएलआयआयसीज) स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या सभा आरबीआयच्या विभागीय कार्यालयाद्वारे निमंत्रित करण्यात येतात आणि संबंधित राज्य सरकारच्या उद्योग सचिवांच्या अध्यक्षतेखाली पार पडतात. यामुळे एका बाजूला राज्य सरकारचे अधिकारी आणि राज्य स्तरीय संस्था आणि दुसऱ्या बाजूला मुदत कर्जे देणाऱ्या संस्था आणि बँका यांना एकमेकांसमोर येण्यासाठी चांगला मंच उपलब्ध झाला आहे. एसएफसीजनी मुदत कर्जे पुरविलेल्या युनीटसना वेळच्या वेळी खेळते भांडवल मंजूर केले जाईल, राज्य सरकारची मार्जीन मनी योजना, सीडबीची नॅशनल इक्विटी फंड योजना अशासारख्या विशेष योजनांची अंमलबजावणी यावर त्या जवळून संनियंत्रण करतात आणि बँकानी पुरविलेल्या माहितीच्या आधारावर उद्योगाना समोरे जावे लागत असलेल्या समस्या आणि एसएसआय क्षेत्रातील आजारीपणाचे पुनरावलोकन करतात. अन्य बाबींमध्ये, स्थानिक राज्यस्तरीय एसएसआय असोशिएशन्सच्या प्रतिनिधीना तीन महिन्यानी घेण्यात येणाऱ्या एसएलआयआयसीच्या सभाना बोलावण्यात येते. एसएलआयआयसीची उपसमिती प्रत्येक आजारी युनीटच्या समस्यांकडे लक्ष देता आणि तिच्या शिफारशी एसएलआयआयसीच्या मंचाकडे विचारार्थ सादर करते.

## ८.एसएमइजवर उच्चाधिकार समिती

केंद्रीय वित्तमंत्र्यानी केलेल्या घोषणेचा एक भाग म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयांमध्ये, विभागीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली एसएलबीसी निमंत्रकाचा प्रतिनिधी, राज्यात एसएमइ वित्तपुरवठ्यात मोठा हिस्सा असणाऱ्या दोन बँकांचे वरिष्ठ स्तरावरील अधिकारी, सीडबीच्या विभागीय कार्यालयाचा प्रतिनिधी, राज्य सरकारचे उद्योग संचालक, राज्यातील एसएमइ/एसएसआय असोशिएशन्सचे एक किंवा दोन वरिष्ठ स्तरावरील प्रतिनिधी आणि एसएफसी/एसआयडीसी मधील दोन वरिष्ठ स्तरावरील अधिकारी सदस्य म्हणून असलेल्या एसएमइजवरील उच्चाधिकार समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. समितीच्या सभा नियतकालाने होतील आणि त्या एसएमइ वित्तपुरवठ्यातील प्रगतीचे त्याचप्रमाणे आजारी एसएमइ/एसएसआय युनीटसच्या पुनर्वसनाचे पुनरावलोकन करतील. त्या अन्य बँका/वित्तीय संस्था आणि राज्य सरकारच्या समन्वयाने, क्षेत्राला क्रेडिटच्या मुक्त प्रवाहात जर कुठे कोंडी निर्माण झाली असेल तर ती फोडतील. या समित्या समूह/ जिल्हा स्तरावर अशाच प्रकारच्या समित्यांच्या आवश्यकतेबाबत निर्णय घेतील.

## ९. एसएमइजसाठी कर्ज पुनर्रचना यंत्रणा

आदरणीय वित्त मंत्र्यांनी लघु आणि मध्यम उद्योगांना क्रेडिटला गति देण्यासाठी केलेल्या घोषणेचा एक भाग म्हणून, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँकींग प्रचालन आणि विकास विभागाद्वारे एसएमइ क्षेत्रातील युनीटससाठी एक कर्ज पुनर्रचना यंत्रणा तयार केली आहे आणि सर्व व्यावसायिक बँकांना परिपत्रक क्र. डीबीओडी.बीपी.बीसी.क्र. ३४/२१.०४.१३२/२००५-०६ दिनांक सप्टेंबर ८, २००५ अन्वये कळविली आहे. ही सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे सर्व पात्र लघु आणि मध्यम उद्योगांच्या कर्जाची पुनर्रचना केली जाईल याची खात्री करण्यासाठी निर्गमित केल्या आहेत. ही मार्गदर्शक तत्त्वे खालील एककांना लागू होतील, जी जीवनक्षम किंवा संभवतः जीवनक्षम आहेतः

अ) बँकेच्या देय स्तराचा विचार न करता, सर्व नॉन-कॉर्पोरेट एसएमइज

ब) बँकेच्या देय स्तराचा विचार न करता, एकाच बँकेकडून बँकींग सुविधांचा लाभ घेणाऱ्या सर्व कॉर्पोरेट एसएमइज.

क) सर्व कॉर्पोरेट एसएमइज ज्यांची बहुपक्षीय/सांघिक बँकींग व्यवस्थेखालील निधीकृत आणि ना-निधीकृत थकित रक्कम रु. १० कोटींपर्यंत आहे.

ड) इच्छापूर्वक कसूर, अफरातफर आणि दुष्कर्मात सामील असणारी खाती या मार्गदर्शक तत्त्वांखाली पुनर्रचनेला पात्र असणार नाहीत.

इ) बँकांनी ‘लॉस ॲसेट’ म्हणून वर्गीकृत केलेली खाती पुनर्रचनेला पात्र असणार नाहीत.

रु. १० कोटी आणि त्याहून अधिक निधीकृत आणि ना-निधीकृत थकित रक्कम असणाऱ्या सर्व कॉर्पोरेट एसएमइजना, बँकींग प्रचालन आणि विकास विभागाने परिपत्रक क्र. डिबीओडी. बीपी.बीसी.४५/२१.०४.१३२/२००५-०६ दिनांक नोव्हेंबर १०, २००५ अन्वये स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली आहेत.

## १० समूह दृष्टीकोन

लघु उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांनी एसएसआयच्या केंद्रीभूत विकासासाठी ६० समूह निश्चित केले आहेत. सर्व एसएलबीसी निमंत्रक बँकांना त्यांच्या वार्षिक क्रेडिट योजनेत, भारत सरकारच्या लघु उद्योग मंत्रालयाने निश्चित केलेल्या समूहातील क्रेडिटच्या गरजा अंतर्भूत करण्यास कळविले आहे.

गांगुली समितीच्या शिफारशींनुसार बँकांना कळविण्यात आले आहे कि कस्टमर फोकस, कॉस्ट कंट्रोल, क्रॉस सेल आणि कंटेन रिस्क असा ४-सी दृष्टीकोन स्वीकारून मान्यताप्राप्त एसएमइ समूहाना बँकिंग सेवा देऊ करून एसएसआय क्षेत्राच्या विविध गरजा पुरविण्यासाठी संपूर्ण-सेवा दृष्टीकोन ठेवता येईल. कर्ज देण्यात समूह आधारित दृष्टीकोन अधिक फायदेशीर असेलः

(१) सुनिश्चित आणि मान्यताप्राप्त समूहांशी व्यवहार करण्यात;

(२) जोखमीच्या निर्धारणासाठी उचित माहितीची उपलब्धता;

(३) कर्ज देणाऱ्या संस्थांकडून संनियंत्रण.

व्यापारी पूर्वेतिहास, स्पर्धात्मकता आणि वृध्दीची क्षमता आणि/किंवा विशिष्ट समूहाच्या संबंधातील अन्य माहिती अशा घट्कांच्या आधारे समूह निश्चित करता येतील.

एसएमइ क्षेत्राला वित्तपुरवठा करताना समूह आधारित दृष्टीकोन व्यावहारिक खर्च, जोखमी सौम्य करणे अशा बाबतीत घट करणे शक्य करतो आणि पायाभूत सुविधांत सुधारणांसाठी उचित स्तर सुध्दा प्राप्त करून देत असल्याने, एसएमइ क्षेत्राला क्रेडिट गतिमान करण्यासाठी केंद्रीय वित्तमंत्र्यानी केलेल्या घोषणेचा एक भाग़ म्हणून, बँकांना ते मुद्द्याचे क्षेत्र मानावे आणि एसएमइला वित्तपुरवठ्यासाठी ते वाढत्या प्रमाणात स्वीकारावे असे कळविण्यात आले आहे. इंडियन बँक्स असोशिएशनच्या सहयोगाने सीडबी निश्चित केलेल्या प्रत्येक समूहातील जोखमींबाबत सामान्य माहिती जमा करण्यासाठी आणि एकत्रित करण्यासाठी पावले उचलील आणि लघु (लहान सहित) उद्योगांसाठी आयटी-एनॅबलड उपयोजिता, मूल्यन आणि संनियंत्रण यंत्रणा विकसित करील. हा उपाय व्यावहारिक खर्च कमी करण्यात आणि समूहातील लघु आणि लहान उद्योगांकडे क्रेडीटचा प्रवाह सुधारण्यास सहाय्यक ठरेल अशी अपेक्षा आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारीमार्फत समूहातील पायाभूत विकासासाठी वित्तपुरवठ्याचे पर्याय विस्तारित करण्यासाठी, सीडबी हितसंबंधीयांशी समंत्रणा करून योजना तयार करील.

## ११. एसएसआय/एसएमइ क्षेत्राला क्रेडिटच्या प्रवाहासाठी समित्या

**११.१** एसएसआय क्षेत्राला संस्थात्मक क्रेडिटची पर्याप्तता आणि अन्य संबंधित पैलू तपासण्यासाठी समितीचा(नायक समिती) अहवाल ही समिती भारतीय रिझर्व्ह बँकेने डिसेंबर १९९१ मध्ये त्यावेळचे डेप्युटी गव्हर्नर श्री. पी. आर. नायक यांच्या अध्यक्षतेखाली, एसएसआयजना वित्तपुरवठा प्राप्त करताना सामना कराव्या लागणाऱ्या विषयांची तपासणी करण्यासाठी स्थापन केली होती. समितीने आपला अहवाल १९९२ मध्ये सादर केला. समितीच्या सर्व मुख्य शिफारशी स्वीकारण्यात आल्या आहेत आणि इतर बाबींबरोबरच बँकांना कळविण्यात आले आहेः

१) लघु उद्योग क्षेत्राच्या क्रेडिटच्या गरजा पूर्ण करताना ग्रामीण उद्योग, लहान उद्योग आणि अन्य लघु उद्योग यांना याच क्रमाने प्राधान्य देण्यात यावे.

२) स्वतंत्रपणे ज्यांची क्रेडिट मर्यादा रु. २ लाखांपर्यंत आहे (आता रु. ५ कोटींपर्यंत वाढविली आहे) त्यांच्या अंदाजित वार्षिक उलाढालीच्या किमान २० % आधारावर हिशोब केलेली खेळत्या भांडवलाची मर्यादा एसएसआय युनीटसना मंजूर करा.

३) एसएसआय क्षेत्राच्या वास्तव गरजा पूर्णपणे भागविल्या जातील याची खात्री करण्यासाठी ‘बॉटम-अप’ तत्त्वावर वार्षिक क्रेडिट अंदाजपत्रक तयार करा.

४) एसएसआयजच्या आर्थिक गरजा (खेळते भांडवल आणि मुदत कर्ज अशा दोन्ही) पूर्ण करण्यासाठी सीडबीची 'एक खिडकी योजना' सर्व जिल्ह्यात राबवा;

५) क्रेडिट मंजूर करण्यात आणि त्याच्या वाटपात कोणतीहि दिरंगाई होणार नाही याची खात्री करा. कर्ज प्रस्तावाची क्रेडिट मर्यादा फेटाळण्याच्या/कपात करण्याच्या प्रकरणांची उच्च अधिकाऱ्यांना माहिती द्या;

६) क्रेडिट मंजूर करण्यासाठी 'कशासाठी काहीतरी' म्हणून सक्तीच्या ठेवीचा आग्रह धरू नका;

७) एसएसआय विशेष शाखा उघडा किंवा बऱ्यापैकी मोठ्या संख्येने एसएसआय कर्ज खाती असणाऱ्या शाखा एसएसआय विशेष म्हणून रूपांतरित करा;

८) आजारी एसएसआय युनीटस निश्चित करा आणि त्यांना उपचारांच्या कार्यक्रमात सामील करून घेण्यासाठी पावले उचला;

९) एसएसआय ऋणकोंसाठी कर्जाच्या अर्जाचे नमुने प्रमाणित करा; आणि

१०) विशेष शाखांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या दृष्टीकोनात बदल घडवून आणण्यसाठी त्यांना प्रशिक्षण द्या.

## ११.२ एसएसआयला क्रेडिटवरील उच्चस्तरीय समिती (कपूर समिती) चा अहवाल

भारतीय रिझर्व्ह बँकेने श्री एस. एल. कपूर, (भाप्रसे, निवृत्त), माजी सचिव, भारत सरकार, उद्योग मंत्रालय यांच्या नेतृत्वाखाली एक एक-सदस्य उच्चस्तरीय समिती एसएसआय क्षेत्राला क्रेडिटच्या पोचवणी यंत्रणेत सुधारणा आणि कार्यपध्दती सुलभ करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी नियुक्त केली होती. समितीने एसएसआय क्षेत्राला वित्तपुरवठा करण्याशी संबंधित विविध क्षेत्रांना सामावून घेणाऱ्या १२६ शिफारशी केल्या होत्या. या शिफारशी रिझर्व्ह बँकेने तपासल्या आहेत आणि ८८ शिफारशी स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ज्यामध्ये खालील महत्त्वाच्या शिफारशी समाविष्ट आहेतः

१) तदर्थ मर्यादा मंजूर करण्यासाठी शाखा व्यवस्थापकांना अधिक अधिकारांचे प्रत्यायोजन करणे;

२) अर्जाचे नमुने सुलभ करणे;

३) क्रेडिटच्या गरजांचे निर्धारण करण्यासाठी स्वतःचे नियम ठरविण्यासाठी बँकांना स्वातंत्र्य;

४) अधिक एसएसआय विशेष शाखा उघडणे;

५) संयुक्त कर्जासाठी मर्यादेत रु. ५ कोटींपर्यंत वाढ (आता रु. १ कोटींपर्यंत वाढविण्यात आली आहे);

६) वसूली यंत्रणा मजबूत करणे;

७) बँका मागास राज्यांकडे अधिक लक्ष देणार;

८) लहान प्रकल्पांचे मूल्यन करण्यासाठी शाखा व्यवस्थापकांना विशेष प्रशिक्षण देणे;

९) बँका ग्राहक तक्रार यंत्रणा अधिक पारदर्शक करणार आणि तक्रारी हाताळण्यासाठी आण त्यांचे संनियंत्रण करण्यासाठी कार्यपध्दती अधिक सुलभ करणार.

**११.३ एसएसआय क्षेत्राला क्रेडिटच्या प्रवाहावर कार्यकारी गटाचा(गांगुली समिती) अहवाल**

मॉनेटरी आणि क्रेडिट पॉलीसी २००३-२००४ च्या मध्यकालीन पुनरावलोकना दरम्यान भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरनी केलेल्या घोषणेनुसार डॉ. ए. एस. गांगुली यांच्या अध्यक्षतेखाली 'एसएसअआय क्षेत्राला क्रेडिटचा प्रवाह यावर कार्यकारी गटाची स्थापना करण्यात आली होती. समितीने एसएसआय क्षेत्राला वित्तपुरवठा करण्याशी संबंधित विविध क्षेत्राना सामावून घेणाऱ्या ३१ शिफारशी केल्या होत्या. आरबीआय आणि बँकांशी संबंधित शिफारशी तपासण्यात आल्या आणि आतापर्यंत ८ स्वीकारल्या आहेत आणि अंमलबजावणीसाठी बँकांना शिफारस करण्यात आली आहे त्या खालील प्रमाणे आहेतः

१) एसएमइ क्षेत्राला वित्तपुरवठा करण्यासाठी समूह आधारित दृष्टीकोनाचा स्वीकार;

२) लघु आणि लहान उद्योग आणि व्याक्तिगत उद्योजकांना सेवा पुरविणाऱ्या आघाडीच्या बँकानी विशिष्ट प्रकल्प प्रायोजित करणे त्याचप्रमाणे एनजीओजच्या यशस्वी कार्यशील नमुन्यांना भरपूर प्रसिध्दी देणे;

३) उत्तर पूर्वी विभागात प्रचालन करणाऱ्या बँकांनी पर्वतीय क्षेत्रातील विशिष्ट परिस्थिती आणि वारंवार येणाऱ्या पूरामुळे वाहतूकीत येणाऱ्या अडथळ्यामुळे त्यांच्या व्यावसायिक अंदाजाच्या आधारावर, उच्चतर खेळत्या भांडवलाच्या मर्यादा मंजूर करणे.

४) ग्रामीण उद्योगांच्या प्रवर्तनासाठी आणि ग्रामीण कारागीर, ग्रामीण उद्योग आणि ग्रामीण उद्योजकाना क्रेडिट प्रवाहात सुधारणा करण्यासाठी बँकानी नवीन साधने अजमावणे; आणि

५) विदेशी बँकांनी त्यांच्या प्राधान्य क्षेत्राला कर्ज देण्यातील तूटीसाठी सीडबीकडे ठेवलेल्या ठेवींच्या कालावधीचा तसेच व्याज दराच्या रचनेचा पुनर्विचार करणे.

**११.४ एसएमइ क्षेत्राला क्रेडिट प्रवाहावरील मार्गदर्शक तत्त्वांच्या पुनरावलोकनासाठी अंतर्गत गट**

इतर विषयांबरोबरच रिझर्व्ह बँकेने एसएसइजना वित्तपुरवठा करण्याबाबत भूतकाळात निर्गमित केलेल्या सर्व परिपत्रकांचे आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि एसएसआय/मध्यम उद्योगांच्या कर्ज खात्यांच्या पुनर्रचनेसाठी उचित अटी सुचविण्यासाठी आणि आजारी एसएसआयजच्या परिचर्येसाठी रिझर्व्ह बँकेने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची तपासणी करण्यासाठी आणि या नियमांची योग्य शिथीलता आणि उदारता सुचविण्यासाठीसुध्दा श्री सी.एस.मूर्थी, प्रभारी-सीजीएम, आरपीसीडी, मध्यवर्ती कार्यालय, भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या अध्यक्षतेखाली एक अंतर्गत गट स्थापन करण्यात आला होता. या गटाने आपला अहवाल जून ६, २००५ रोजी सादर केला. अंतर्गत गटाने शिफारस केली आहेः

(१) एसएसआय आणि मध्यम उद्योगांना वित्तपुरवठा करण्यातील प्रगतीचे नियतकालीन पुनरावलोकन करण्यासाठी आणि क्षेत्राला क्रेडिटच्या सुलभ प्रवाहातील कोंडी, काही असल्यास, फोडण्यासाठी अन्य बँका/वित्तीय संस्था आणि राज्य सरकारे यांच्याबरोबर समन्वय साधण्यासाठी सुध्दा रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयात अधिकार प्रदत्त समित्यांची स्थापना करणे.

(२) उद्योजकांना बँक क्रेडिटचा सहजपणे लाभ घेता यावा यासाठी एसएसआय आणि एसएमइ युनीटसचे प्राबल्य असलेल्या निश्चित केलेल्या समूहात/केंद्रात एसएमइ विशेष शाखा उघडणे आणि बँक कर्मचाऱ्यांना आवश्यक ते कौशल्य विकसित करण्यासाठी सुसज्ज करणे.

(३) या गटाने काही मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन एसएमइ युनीटसच्या खात्यांची पुनर्रचना करण्याच्या संबंधात धोरण तयार करण्यासाठी बँकांच्या बोर्डांना अधिकार देण्याचा प्रस्ताव दिला आहे. बहुपक्षीय  बँकिंग व्यवस्थेखाली रु. १० कोटी किंवा अधिक एकूण क्रेडिट मर्यादा असलेल्या कॉर्पोरेट एसएसआय/एसएमइ ऋणकोंच्या खात्यांची पुनर्रचना सुधारित सीडीआर यंत्रणेखाली सामावून घेतली जाईल.

(४) आजारी एसएसआय युनीटच्या व्याख्येवरील अस्तित्वातील मार्गदर्शक तत्त्वे पुढे चालू ठेवण्याची शिफारस करताना, गटाने अशी शिफारस केली आहे कि जीवनक्षमतेशी संबंधित इतर सर्व सूचना आणि आरबीआयने विहीत केल्याप्रमाणे आजारी एसएसआय युनीटसना देण्यात येणाऱ्या सवलती आणि सहाय्य यासाठीचे मापदंड मागे घेण्यात यावेत आणि बँकांना त्यांच्या संचालक मंडळाच्या मंजूरीने त्यांची स्वतःची मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची परवानगी द्यावी.

गटाच्या बहुसंख्य शिफारशी भारत सरकारने स्वीकारल्या आहेत आणि एसएमइ क्षेत्राला क्रेडिट गतिमान करण्यासाठी केंद्रीय वित्तमंत्र्यानी केलेल्या घोषणेचा एक भाग म्हणून अंतर्भूत केल्या आहेत.

**१२. लघु अणि मध्यम उद्योगांना क्रेडिट गतिमान करण्यसाठी केंद्रीय वित्तमंत्र्यानी जाहीर केलेले पॉलिसी पॅकेज**

एसएमइ क्षेत्रासाठी एक महत्त्वाची घटना म्हणजे केंद्रीय वित्तमंत्र्यानी लघु आणि मध्यम उद्योगाना क्रेडिट गतिमान करण्यासाठी जाहीर केलेले पॉलिसी पॅकेज.  उक्त पॉलिसी घोषणेच्या आधारावर, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना

(आरपीसीडी.पीएलएनएफएस.बीसी.क्र.३१/०६.०२.३१/२००५-०६ दिनांक ऑगस्ट १९, २००५) आणि खाजगी, विदेशी आणि आरआरबीजना (आरपीसीडी.पीएलएनएफएस.बीसी.क्र. ३५/०६.०२.३१/२००५-०६ दिनांक ऑगस्ट २५, २००५) अशी उक्त धोरणात्मक उपायांची अंमलबजावणी करण्यासाठी दोन वेगवेगळी परिपत्रके आणि आम्ही निर्गमित केली आहेत. पॉलिसी पॅकेजची काही ठळक वैशिष्ट्ये आहेतः

- लघु आणि मध्यम उद्योगांची(एसएमइज) व्याख्या
- एसएमइ क्षेत्राला वित्तपुरवठा करण्यासाठी बँकानी स्वतःची लक्ष्ये निश्चित करणे
- एसएमइ क्षेत्राला कर्जांच्या खर्चाचे सूसूत्रीकरण करण्याचे उपाय
- एसएमइ क्षेत्राला औपचारिक क्रेडिटच्या आऊट रिचमध्ये वाढ करण्यासाठी उपाय
- एसएमइ क्षेत्राला वित्तपुरवठा करण्यासाठी समूह आधारित दृष्टीकोन
- रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयात एसएमइजसाठी अधिकारदत्त समित्यांची स्थापना
- क्रेडिटचा खर्च उद्योगाच्या श्रेणीशी निगडित करून पारदर्शक श्रेणीकरण यंत्रणा स्वीकारून एसएमइ क्षेत्राला कर्जाच्या खर्चाचे सुसूत्रीकरण करण्यासाठी पावले
- बँकानी क्रेडिट अ‍ॅप्रेझल अँड रेटिंग टूल(सीएआरटी), रिस्क अ‍ॅसेसमेंट मॉडेल (आरएएम) आणि
- एसएमइ प्रस्तावांच्या जोखमीचे निर्धारण करण्यासाठी, सीडबीने त्यांच्या व्यवहाराचे खर्च कमी करण्यासाठी विकसित केलेल्या सर्वंकष श्रेणीकरण नमुन्याचा फायदा घेण्याबाबत विचार करावा.
- नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशनने सुरू केलेल्या क्रेडिट श्रेणीकरण योजनेखाली प्रतिष्ठित क्रेडिट श्रेणीकरण एजन्सीजद्वारा करण्यात येणाऱ्या एसएसआय युनीटसच्या श्रेणीकरणाचाहि बँकांनी विचार करावा.
- बँकांच्या संचालक मंडळांनी तयार केलेल्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांचा त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेने निर्गमित केलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्त्वांचा संबंधित बँकांच्या तसेच सीडबीच्या वेबसाइटवर प्रदर्शित करून आणि त्यांच्या बँक शाखांमध्ये ठळकपणे प्रदर्शित करण्याद्वारे अधिकाधिक प्रसार आणि सहज उपलब्धता. केंद्रीय वित्तमंत्र्यांनी ऑगस्ट १०, २००५ रोजी लोकसभेत जाहीर केलेल्या 'एसएमइ क्षेत्राला क्रेडिट गतिमान करण्यासाठी पॉलिसी पॅकेज' ची एक प्रत **परिशिष्ट ४** मध्ये देण्यात आली आहे.

## १३. मायक्रो, स्मॉल अँड मिडीयम एन्टरप्राइझेस डेवलपमेंट(एमएसएमइडी) अधिनियम, २००६

भारत सरकारने मायक्रो, स्मॉल अँड मिडीयम एन्टरप्राइझेस डेवलपमेंट (एमएसएमइडी) अधिनियम २००६, ला जून १६, २००६ रोजी कायदेशीर रूप दिले आहे जो ऑक्टोबर २, २००६ रोजी अधिसूचित करण्यात आला आहे. मायक्रो, स्मॉल अँड मिडीयम एन्टरप्राइझेस डेवलपमेंट (एमएसएमइडी)अधिनियम, २००६ च्या अधिसूचनेशी सुसंगत उत्पादन आणि निर्मिती किंवा सेवा पुरविणे आणि देणे यात व्यस्त असणाऱ्या मायक्रो, लघु आणि मध्यम उद्योगांची व्याख्या बदलण्यात आली आहे आणि त्याची बँकांनी

परिपत्रक आरपीसीडी.पीएलएनएफएस.बीसी.क्र. ६३/०६.०२.३१/२००६-०७ दिनांक एप्रिल ४, २००७ अन्वये कळविल्याप्रमाणे अन्य धोरणात्मक उपायांबरोबरच तातडीच्या प्रभावाने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

# लघु उद्योग मंत्रालय
# अधिसूचना
## नवी दिल्ली, ५ ऑक्टोबर, २००६

एस.ओ. १७२२(इ) — येथे सदरहू अधिनियम म्हणून संदर्भित अधिनियमाच्या उपकलम (१) २००६ चा ) द्वारे प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, केंद्र सरकार खालील बाबी विनिर्दिष्टीत करीत आहे, ज्याची किंमत सदरहू अधिनियमाच्या कलम ७(१) मध्ये नमूद केलेल्या उद्योगांच्या बाबतीत यंत्रसामग्री आणि संयंत्रातील गुंतवणूकीचा हिशोब करताना वगळण्यात यावी, त्या अशाः

(१) टूल्स, जिग्स, डाइज, मोल्ड्स आणि देखभालीसाठी सुटे भाग आणि कंझ्युमेबल स्टोअर्सची किंमत,
(२) संयंत्र आणि यंत्रसामग्रीची उभारणी
(३) संशोधन आणि विकास उपकरणे आणि प्रदूषण नियंत्रक उपकरणे
(४) उर्जा निर्मिती संच आणि राज्य विद्युत मंडळाच्या नियमनांनुसार उद्योगाने स्थापित केलेले अतिरिक्त रोहित्र
(५) नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन किंवा स्टेट स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन याना प्रदान केलेले बँकिंग आकार किंवा सेवा आकार
(६) केबल्स, वायरिंग, बस बार्स, इलेक्ट्रिकल कंट्रोल पॅनेल्स (स्वतंत्र यंत्रावर माउंट न केलेले), ऑइल सर्किट ब्रेकर्स किंवा मिनिएचर सर्किट ब्रेकर्स जे खास करून संयंत्र आणि यंत्रसामग्रीला विद्युत पुरवठा करण्यासाठी किंवा सुरक्षा उपाय म्हणून वापरले जातात.
(७) वायू उत्पादक संयंत्रे
(८) देशी यंत्रसामग्रीच्या निर्मितीच्या ठिकाणापासून उद्योगाच्या ठिकाणापर्यंत वाहतूकीचा आकार (विक्रीकर किंवा मूल्यवर्धित कर आणि अबकारी शिल्क वगळून).
(९) .संयंत्र आणि यंत्रसामग्रीच्या उभारणीसाठी तांत्रिक जाणकारीसाठी प्रदान केलेले आकार
(१०) असे स्टोरेज टँक्स ज्यात कच्चा माल आणि परिपूर्ण उत्पादने साठविली जातात आमि ज्यांचा निर्मिती प्रक्रियेशी संबंध नाही.
(११) अग्निशामक उपकरणे.

२. संयंत्रे आणि यंत्रसामग्रीतील गुंतवणूकीचा हिशोब करताना परिच्छेद १ चा संदर्भ घ्यावा, ज्यात मूळ किंमत, संयंत्र आणि यंत्रसामग्री नवी आहे अथवा जुनी हे विचारात न घेता, धरली जाईल परंतु जर, यंत्रसामग्री आयात असेल तर, मूल्याचा हिशोब करताना पुढीलचा समावेश करावा, त्या अशाः
(१) आयात शुल्क (बंदरातून कारखान्याच्या जागेपर्यंत वाहतूकीचा खर्च, बंदरात प्रदान केलेले डिमरेज वगैरेसारखे संकीर्ण खर्च वगळून)
(२) नौप्रेष आकार
(३) कस्टम्स निपटारा आकार, आणि
(४) विक्री कर किंवा मूल्यवर्धित कर.

(एफ.क्र.४(१)/२००६-एमएसएमइ-पॉलीसी)
जवाहर सिरकार, अतिरिक्त सचिव

**परिशिष्ट २**

**विद्यमान सीडबी शाखांनी सामावून घेतलेल्या एसएमइ समूहांची सूची**

| अनु.क्र. | शाखा कार्यालये | एसएसआय समूहांची संख्या | उत्पादन |
|---|---|---|---|
| १ | हैद्राबाद | ५ | सिलिंग फॅन, इलेक्ट्रॉनिक वस्तू, औषधे-बल्क ड्रग्स, हँड पंप सेटस आणि फाउंड्री |
| २ | पाटणा | १ | पितळी आणि जर्मन भांडी |
| ३ | दिल्ली | १९ | स्टेनलेस स्टीलची भांडी आणि कापण्याचे सहित्य (चाकू, सुऱ्या इत्यादि), रसायने, विद्युत अभियांत्रिकी उपकरण, इलेक्ट्रॉनिक वस्तू, अन्नोत्पादने, चामडी वस्तू, यंत्र अभियांत्रिकी उपकरणे, पॅकेजिंग सामग्री, कागदी उत्पादने, प्लॅस्टीक उत्पादने, वायर ड्राइंग्स, धातू जोडणी, फर्निचर, इलेक्ट्रोप्लेटींग, वाहनांचे घटक, होजियरी, तयार कपडे, सॅनिटरी फिटींग्स |
| ४ | अहमदाबाद | १७ | फार्मास्युटिकल्स, डाइज आणि इंटरमिजिएटस, मोल्डेड प्लॅस्टीक उत्पादने, तयार कपडे, टेक्स्टाइल यंत्रसामग्रीचे भाग, हिऱ्यांवरील प्रक्रिया, मशिन टूल्स, कास्टींग्स आणि फोर्जिंग्स, स्टीलची भांडी, लाकडी उत्पादने आणि फर्निचर, कागदी उत्पादने, चामड्याची पादत्राणे, धुलाई पावडर आणि साबण, संगमरवरी स्लॅब्स, विद्युतचलित पंप, इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहनांचे भाग |
| ५ | सुरत | ४ | हिऱ्यांवरील प्रक्रिया, यंत्रमाग, लाकडी उत्पादने आणि फर्निचर, टेक्स्टाइल यंत्रसामग्री |
| ६ | बडोदा | ३ | फार्मास्युटीकल-बल्क ड्रग्स, प्लॅस्टीक प्रक्रिया आणि लाकडी उत्पादने आणि फर्निचर |
| ७ | गोवा | १ | फार्मास्युटीकल |
| ८ | फरिदाबाद | ३ | वाहनांचे घटक, इंजिनीयरिंग क्लस्टर, स्टोन क्रशिंग |
| ९ | गुरगाव | ५ | वाहनांचे घटक, इलेक्ट्रॉनिक वस्तू, विद्युत अभियांत्रिकी उपकरणे, तयार कपडे, यंत्र अभियांत्रिकी उपकरणे |
| १० | पारवानू (बड्डी) | १ | अभियांत्रिकी उपकरणे |
| ११ | जम्मू | ३ | स्टील रि-रोलिंग, तेलाच्या घाणी, भात गिरणी |
| १२ | जमशेदपूर | १ | अभियांत्रिकी आणि जोडणी |
| १३ | बंगलोर | ६ | यंत्रमाग, इलेक्ट्रॉनिक वस्तू, तयार कपडे, लाइट इंजिनीयरिंग, चामडी वस्तू |
| १४ | कोची/ एर्नाकुलम | ३ | रबर उत्पादने, यंत्रमाग आणि सागरी अन्नाची प्रक्रिया |
| १५ | औरंगाबाद | २ | वाहनांचे घटक आणि फार्मास्युटीकल्स-बल्क ड्रग्स |
| १६ | मुंबई | ११ | इलेक्ट्रॉनिक वस्तू, फार्मास्युटीकल-बेसिक ड्रग्स, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | खेळणी(प्लॅस्टीक), तयार कपडे, होजियरी, मशीन टूल्स, अभियांत्रिकी उपकरणे, रसायने, पॅकेजिंग सामग्री, हँडटूल्स, प्लॅस्टीक उत्पादने |
| १७ | नागपूर | ६ | यंत्रमाग, अभियांत्रिकी आणि जोडणी, स्टील फर्निचर, तयार कपडे, हँडटूल्स, अन्न प्रक्रिया |
| १८ | पुणे | ६ | वाहनांचे घटक, इलेक्ट्रॉनिक वस्तू, अन्नोत्पादने, तयार कपडे, फार्मास्युटीकल्स-बल्क ड्रग्स, फायबर ग्लास |
| १९ | ठाणे | २ | फार्मास्युटीकल्स-बल्क ड्रग्स आणि सागरी अन्न |
| २० | भोपाळ | १ | अभियांत्रिकी उपकरणे |
| २१ | इंदूर | ४ | फार्मास्युटीकल्स-बल्क ड्रग्स, तयार कपडे, अन्न प्रक्रिया, वाहनांचे घटक |
| २२ | लुधियाना | ९ | वाहनांचे घटक, सायकलचे भाग, होजियरी, शिलाई यंत्रांचे घटक, औद्योगिक फास्टनर्स, हँडटूल्स, मशिन टूल्स, फोर्जिंग, इलेक्ट्रोप्लेटींग |
| २३ | जयपूर | ७ | रत्ने आणि जवाहीर, बॉल बेअरिंग, विद्युत अभियांत्रिकी उपकरणे, अन्नोत्पादने, कपडे, चुना, यंत्र अभियांत्रिकी उपकरणे |
| २४ | चेन्नई | ३ | वाहनांचे घटक, चामड्याच्या वस्तू, इलेट्रोप्लेटींग |
| २५ | कोईमतूर | ६ | डिझेल इंजिन्स, कृषी साधने, मशिन टूल्स, कास्टींग्स आणि फोर्जिंग, यंत्रमाग, ओली दळण यंत्रे |
| २६ | तिरुपूर | १ | होजियरी |
| २७ | नोइडा/गाझियाबाद | १० | इलेक्ट्रॉनिक वस्तू, खेळणी, रसायने, विद्युत अभियांत्रिकी उपकरणे, कपडे, यंत्र अभियांत्रिकी उपकरणे, पॅकेजिंग सामग्री, प्लॅस्टीक उत्पादने, रसायने |
| २८ | कानपूर | ३ | सॅडलरी, कापडी होजियरी, चामड्याच्या वस्तू |
| २९ | वाराणशी | ४ | शीटवर्क (गोल दिवे), यंत्रमाग, कृषी साधने, विद्युत पंखे |
| ३० | डेहराडून | १ | मिनिएचर व्हॅक्युम बल्ब |
| ३१ | नाशिक (लवकरच चालू होत आहे) | १ | स्टील फर्निचर |
| **एकूण** | | **१४९** | |

**परिशिष्ट ३**

**भारतातील एस एम ई एककांचा जमाव (क्लस्टर) (युनिडोद्वारा परिचित)**

| अ. न. | राज्य | जिल्हा | ठिकाण | उत्पादन |
|---|---|---|---|---|
| १ | आंध्र प्रदेश | अनंतपुर | रायदुर्ग | तयार कपडे |
| २ | आंध्र प्रदेश | अनंतपुर | चित्रदुर्ग | जीन्स कपडे |
| ३ | आंध्र प्रदेश | चित्तूर | नगरी | यंत्र माग |
| ४ | आंध्र प्रदेश | चित्तूर | वेनतिमलता श्रिकलहस्ती, चंदुर | पितळी भांडी |
| ५ | आंध्र प्रदेश | पूर्व गोदावरी | पूर्व गोदावरी | भात गिरणी |
| ६ | आंध्र प्रदेश | पूर्व गोदावरी | राजमुंद्री | ग्रॅफाईटची मूस |
| ७ | आंध्र प्रदेश | पूर्व गोदावरी | पूर्व गोदावरी | काथ्या व काथ्या उत्पादने |
| ८ | आंध्र प्रदेश | पूर्व गोदावरी | राजमुंद्री | जर्मन भांडी |
| ९ | आंध्र प्रदेश | पूर्व गोदावरी आणि पश्चिम गोदावरी | पूर्वगोदावरी(पूग) आणि पश्चिम गोदावरी | अग्निविरोधक उत्पादन |
| १० | आंध्र प्रदेश | गुंटुर | गुंटुर | यंत्र माग |
| ११ | आंध्र प्रदेश | गुंटुर | गुंटुर | चुन्याची राख करणे,चुन्याचे विस्तापन |
| १२ | आंध्र प्रदेश | गुंटुर | मचेरला | लाकडी फर्निचर |
| १३ | आंध्र प्रदेश | हैदराबाद | हैदराबाद | विद्युत पंखे |
| १४ | आंध्र प्रदेश | हैदराबाद | हैदराबाद | विद्युत अभियांत्रिकी उपकरणे |
| १५ | आंध्र प्रदेश | हैदराबाद | हैदराबाद | फार्मास्युटीकल्स- बल्क ड्रग्स |
| १६ | आंध्र प्रदेश | हैदराबाद | मुशीराबाद | चामड्याच्या वस्तु |
| १७ | आंध्र प्रदेश | हैदराबाद | हैदराबाद | हँड पंप सेटस |
| १८ | आंध्र प्रदेश | हैदराबाद | हैदराबाद | फाउंड्री |
| १९ | आंध्र प्रदेश | करीमनगर | सिरसिला | यंत्रमाग |
| २० | आंध्र प्रदेश | कृष्णा | मचिलिपटनम | सुवर्ण मुलामा व कृत्रिम अलंकार |
| २१ | आंध्र प्रदेश | कृष्णा | विजयवाडा | भातगिरणी |
| २२ | आंध्र प्रदेश | कृष्णा | चुंदुर,कवडीगुडा, चारमिनार, विजयवाडा | स्टील फर्निचर |
| २३ | आंध्र प्रदेश | कुर्नूल | अदोनी | तेल गिरणी |
| २४ | आंध्र प्रदेश | कुर्नूल | कुर्नूल | कृत्रिम हिरे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | आंध्र प्रदेश | कुर्नूल,कुड्डापह | कुर्नूल(बनगनपल्ले, बेथामचेरिया,कोलिमिगुन्डला) कुड्डापह | पॉलिश केलेल्या फरशा |
| २६ | आंध्र प्रदेश | प्रकसम | मर्कापुरम | दगडी पाट्या |
| २७ | आंध्र प्रदेश | रंगा रेड्डी | बालनगर,जीदिमेतला आणि कुकतपल्ली | मशिन टूल्स |
| २८ | आंध्र प्रदेश | श्रिककुलम | पलसा | काजूवरील प्रकिया |
| २९ | आंध्र प्रदेश | विशाखापट्नम,पूर्व गोदावरी | विशाखापट्नम,ककिनडा | सागरी अन्न |
| ३० | आंध्र प्रदेश | वरनगल | वरनगल | यंत्रमाग |
| ३१ | आंध्र प्रदेश | वरनगल | वरनगल | पितळेच्या वस्तू |
| ३२ | आंध्र प्रदेश | पश्चिम गोदावरी | पश्चिम गोदावरी | भातगिरणी |
| ३३ | बिहार | बेगुसरई | बरौनी | अभियांत्रिकी उत्पादन |
| ३४ | बिहार | मुज्जफरपुर | मुज्जफरपुर | अन्न उत्पादने |
| ३५ | बिहार | पटना | पटना | पितळेची व जर्मन सिल्व्हरची भांडी |
